महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १०२ वे दिनांक : ०६/०४/२०२६ वार : सोमवार

## ग्रामविकास निधीसाठी ६ लाखांची लाच; मंत्रालयातील अधिकाऱ्याला अटक




**मुंबई :** राज्याच्या प्रशासनाचे मुख्य केंद्र असलेल्या मंत्रालयातील लाचखोरीचा सिलसिला थांबण्याचे नाव घेत नाहीये. काही दिवसांपूर्वीच एका मंत्र्यांच्या स्वीय सहायकाला लाच घेताना अटक करण्यात आली होती, ती घटना ताजी असतानाच आता मंत्रालयातील एका बड्या माशावर 'एसीबी'ने (लाचलूचपत प्रतिबंधक विभाग) मोठी कारवाई केली आहे. अर्थ व नियोजन विभागातील कक्ष अधिकारी विलास लाड यांना ६ लाख ३७ हजार रुपयांची भरभक्कम लाच स्वीकारताना खारघर परिसरात रंगेहाथ पकडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामविकास विभागाचा प्रलंबित निधी मंजूर करून देण्यासाठी कक्ष अधिकारी विलास लाड यांनी लाचेची मागणी केली होती. लाचेची ही रक्कम ६ लाख ३७ हजार ५०० रुपये इतकी मोठी होती. नवी मुंबईतील खारघर परिसरात लाचेची ही रक्कम स्वीकारण्यासाठी लाड आले असता, एसीबीने रचलेल्या सापळ्यात ते अलगद अडकले. एका सामान्य माणसाचा वर्षाचा पगारही नसेल, एवढी मोठी रक्कम हा अधिकारी एकाच कामासाठी लाच म्हणून घेत होता, हे विशेष.

मार्च महिन्यात एसीबीने मंत्रालयात केलेल्या कारवायांच्या धडाक्यानंतर, प्रशासकीय वर्तुळात अशी चर्चा होती की ही केवळ 'मार्च एंडिंग'ची धावपळ आहे. मात्र, एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात विलास लाड यांच्यावर झालेली ही कारवाई पाहता, एसीबीने आपला मोर्चा आता कायमस्वरूपी मंत्रालयातील भ्रष्टाचाराकडे वळवल्याचे स्पष्ट झाले आहे. मंत्रालयासारख्या उच्च सुरक्षा आणि जबाबदारीच्या ठिकाणी बसून खुलेआम चालणाऱ्या या व्यवहारांमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मंत्रालयात बसून सर्वसामान्यांच्या फाईली अडवून पैसे उकळण्याचा प्रकार नवीन नसला, तरी एका दिवसात एका वर्षाच्या पगारापेक्षा मोठी रक्कम लाच म्हणून घेण्याचे धाडस पाहून अधिकारी वर्गही अवाक झाला आहे. लाड यांच्या अटकेमुळे मंत्रालयातील अर्थ, नियोजन आणि ग्रामविकास विभागातील इतर संशयास्पद व्यवहारांचीही चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

खारघरमधील या कारवाईमुळे लाचखोरांचे धाबे दणाणले असून, "प्रशासनातील पारदर्शकता केवळ कागदावरच आहे का?" असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित होत आहे. सध्या आरोपी विलास लाड यांची कसून चौकशी सुरू असून, त्यांच्या संपत्तीचीही तपासणी केली जाण्याची शक्यता आहे.

## CDR प्रकरण: दमानियांची चौकशी होणार - फडणवीस



**नाशिक :** अशोक खरातला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कॉल केले होते तसेच अनेक नेत्यांनी खरातला कॉल केल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी दिली होती. या संदर्भातील सीडीआर देखील त्यांनी समोर आणल्याचा दावा केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिली गोष्ट तर अशी आहे अशा प्रकारचा सीडीआर प्राप्त करून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. तो फक्त जी काही तपास यंत्रणा आहेत, तपास करत आहेत, त्यांना तो अधिकार आहे. त्यामुळे अशा पद्धतीचा हा सीडीआर कशा पद्धतीने लीक झाला, तो कोणी लीक केला, या संदर्भातली चौकशी राज्य सरकार करेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असे वाटते की अशा प्रकारच्या सेन्सिटिव्ह केसमध्ये शेवटी केवळ आरोप प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्याविरोधात सबळ पुरावा असेल, त्यांच्या विरुद्ध कारवाई होईल.

## बारामती पोटनिवडणूक: सुनेत्रा पवारांचा काँग्रेसकडे पाठिंब्यासाठी फोन





**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या दोन्ही नेत्यांत नेमकी कोणती चर्चा झाली हे अद्याप समोर आली नाही. पण त्यांच्यात बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्यावर चर्चा झाली असावी असा अंदाज बांधला जात आहे. दरम्यान, काँग्रेसने यापूर्वीच बारामतीची पोटनिवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. पण आता सुनेत्रा पवारांनी स्वतः सपकाळ यांना फोन केल्यामुळे काँग्रेस कोणती भूमिका घेते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले होते. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी येत्या २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. बारामती हा अजित पवारांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे स्वतः सुनेत्रा पवार या मतदारसंघातून मैदानात उतरल्या आहेत. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दर्शवला आहे. हे दोन्ही पक्ष अजित पवारांना आदरांजली म्हणून या निवडणुकीत आपला उमेदवार देणार नाहीत.

पण काँग्रेसने मात्र या निवडणुकीत उमेदवार देण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी रविवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनवरून संवाद साधला आहे. सुनेत्रा पवार व हर्षवर्धन सपकाळ यांच्यात नेमकी काय चर्चा झाली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण सूत्रांनी या दोन्ही नेत्यांत बारामती विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध करण्याच्या मुद्यावर चर्चा झाल्याचा दावा केला आहे. परिणामी, काँग्रेस बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्याच्या आपल्या भूमिकेवर पुन्हा एकदा फेरविचार करण्याची शक्यता वाढली आहे.

सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्याशीही फोनवरून चर्चा केल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्याच्या राजकीय पटलावर पडद्यामागे मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे सुनेत्रा पवार यांनी शनिवारीच शिवसेनेच्या ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना फोन करून त्यांचा पाठिंबा मागितला होता. त्याला ठाकरेंनेही सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे आता काँग्रेसच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवारांची एक मोठी फळी उभी राहिल्याचे चित्र दिसत आहे. यात हिंदुस्तान जनता पार्टीचे सतिश कदम, न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे राघू घटुकडे, राष्ट्रीय किसान बहूजन पार्टीचे अरूण निटुरे यांच्यासह सागर भिसे, गजानन गवळी, त्रिशाला कांबळे, दिलीप अळोणी, दत्तात्रय बेदरे, मिथुन आटोळे, रजाक मुलाणी, संदीप खरात, विलास होळकर, अभिजीत बिचुकले, अनिल तुपे, संकेत गावडे, दादा थोरात आणि अभिजीत कांबळे असे अनेक अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे बारामतीतील ही लढत बहुरंगी होणार असून मतदारांसमोर अनेक पर्याय उभे राहिल्याने निवडणूक अधिक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ एप्रिल २०२६


## हर्सूल तलावात पोहण्याचा मोह बेतला जीवावर : चार तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू



**छत्रपती संभाजीनगर :** वाढत्या उन्हाचा तडाखा आणि रविवारची सुट्टी असा दुग्धशर्करा योग साधून हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या या तरुणांवर काळाने झडप घातल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उन्हाळ्यामुळे अंगाची लाहीलाही होत असल्याने गारवा मिळवण्यासाठी हे तरुण हर्सूल तलावावर पोहण्यासाठी गेले होते. सुरुवातीला तीन मुले तलावात बुडाल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तासाभराच्या अथक परिश्रमानंतर पथकाने तिघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढले. मात्र, तलावाच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक तरुण बुडाल्याची माहिती समोर आल्यानंतर पुन्हा शोधमोहीम राबवण्यात आली, ज्यामध्ये चौथ्या तरुणाचाही मृतदेह हाती लागला.

या दुर्दैवी घटनेत प्राण गमावलेल्यांपैकी अफान खान आणि आदिल शेख अशी दोघांची नावे निष्पन्न झाली आहेत. उर्वरित दोन तरुणांची ओळख पटवण्याचे काम प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू आहे. पोलिसांनी चारही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय घाटी रुग्णालयात पाठवले आहेत.

उन्हाळ्याच्या सुट्टीत जलसाठ्यांवर पोहण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत असते, मात्र सुरक्षेचा अभाव आणि पाण्याचा अंदाज न आल्याने अशा दुर्घटना घडत आहेत. रविवारची ही सुट्टी या चार तरुणांच्या आयुष्यातील शेवटची सुट्टी ठरल्याने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हर्सूल पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, नागरिकांनी अनोळखी जलसाठ्यांमध्ये पोहताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार महाराष्ट्र खो-खोच्या अध्यक्षपदी बिनविरोध



**मुंबई :** "खेळ बदलेल, दिशा बदलेल!" अशा उत्साहात महाराष्ट्र खो-खो विश्वात आज ऐतिहासिक क्षण घडला, जेव्हा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर झाली! खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि मल्लखांबसारख्या परंपरागत खेळांमध्ये राज्य असोसिएशनच्या अध्यक्षपदी पहिल्यांदाच महिला विराजमान झाल्याने हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणार आहे.

सुनेत्रा अजित पवार यांची निवड ही केवळ पदभरती नसून, महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासातील मोठी झेप मानली जात आहे. यापूर्वी हॉकी आणि रायफल संघटनांमध्ये महिला अध्यक्ष होत्या; मात्र खो-खो क्षेत्रात अनेक वर्षांनी हा सन्मान महिलेला मिळाला आहे. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या पदावर सुनेत्रांनी एकहाती बाजी मारत नवा अध्याय सुरू केला आहे.

५ एप्रिल रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. निवडणूक निर्णय अधिकारी अ‍ॅड. धीरज कोल्हे यांनी अधिकृत घोषणा करताच सभागृहात उत्साहाची लाट उसळली. या वेळी लोकेश्वरा (उपाध्यक्ष, भारतीय खो-खो महासंघ व कर्नाटक असोसिएशन) आणि प्रदीप खांडरे (महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन) निरीक्षक म्हणून उपस्थित होते.अ‍ॅड. धीरज कोल्हे यांनी निवडीची घोषणा करताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि आनंदाचा जल्लोष पाहायला मिळाला. त्यानंतर सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार अ‍ॅड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनेत्रा अजित पवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

"नेतृत्व बदलले की दिशा बदलते" याच आशेने आता महाराष्ट्रातील खो-खो विश्व नव्या उंचीच्या प्रतीक्षेत आहे. सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील खेळाडूंना अधिक संधी, उत्तम सुविधा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे यश मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.






## ईद मिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दौलताबाद (जावेद अहमद) :** रमजान ईद च्या निमित्ताने भाजपच्या जिल्हा अल्पसंख्यांक मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष सैय्यद कबीर यांनी दि 05 रविवारी आपल्या निवासस्थानी पिसादेवी येथे ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होतेयावेळी अल्पसंख्याक शहर अध्यक्ष सलीम चिस्ती, अल्पसंख्याक जिल्हा महामंत्री शेख बने, राष्ट्रवादीचे नबी पटेल ,कयुम शेख व भाऊसाहेब दानवे,तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, परिसरातील सरपंच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,सोसायटी चे चेअरमन, महिला आघाडी च्या नेत्या व कार्यकर्ते उपस्थित होतेह कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सैय्यद अमीर, सैय्यद सलमान, सैय्यद समीर,सैय्यद अझहर यांनी परिश्रम घेतले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ एप्रिल २०२६


## पाणपोई

उन्हाळ्यात पाणपोई
भागविते रे तहान
कोणी काढली कल्पना
आहे खूपच महान

उन्हाळ्यात जिथे तिथे
पाणपोई रे दिसते
पाणी पिताच माणूस
आनंदाने रे हसते

भागविते पाणपोई
तहानलेल्याची इच्छा
पाणपोई उभारूनी
पाणी पुरवावे स्वेच्छा

पाणी पिऊनी वाटते
जसे अमृताची धार
जीवनात जगताना
पाणी जगण्याचे सार




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**९७६३२८३७०४***



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि जागतिक दृष्टी विकसित करणारे : डॉ. सय्यद अझरुद्दीन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** "नवे शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांमध्ये केवळ माहितीपुरते शिक्षण न देता सर्जनशीलता, नवोपक्रम, संशोधनवृत्ती आणि जागतिक घडामोडींची जाण विकसित करणारे आहे," असे प्रतिपादन डॉ. सय्यद अझरुद्दीन यांनी केले. ते शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेत बोलत होते.कार्यशाळेतील आपल्या मार्गदर्शनात डॉ. अझरुद्दीन यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील सर्जनशीलता, नवोपक्रम, कृती-आधारित संशोधन प्रकल्प आणि प्रशिक्षण या विषयावर सविस्तर विवेचन केले. त्यांनी सांगितले की, आजच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतरावर भर न देता प्रत्यक्ष अनुभव, कृती-आधारित शिक्षण, प्रकल्पाधारित अध्ययन आणि संशोधनाच्या माध्यमातून ज्ञान

आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, स्वतंत्र विचार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.याच कार्यशाळेतील दुसऱ्या सत्रात त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारातील संधी, जागतिक व्यापार व्यवस्थेचा प्रवास आणि अलीकडील युद्धांचा परिणाम या विषयावरही मार्गदर्शन केले. जागतिक व्यापार व्यवस्थेतील बदल, आर्थिक स्पर्धा, आंतरराष्ट्रीय करार, तसेच अलीकडील युद्धांचा व्यापार, उद्योग आणि रोजगार क्षेत्रावर होणारा परिणाम याचे त्यांनी सखोल विश्लेषण केले. बदलत्या जागतिक परिस्थितीचा अभ्यास विद्यार्थ्यांनी आणि संशोधकांनी करणे अत्यंत गरजेचे असून त्यामुळे व्यापक दृष्टी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संधींची जाणीव निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले.डॉ. अझरुद्दीन यांच्या मते, आजच्या युवकांनी स्थानिक प्रश्नांबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचाही अभ्यास करून ज्ञानाच्या नव्या क्षितिजांकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. शिक्षण, संशोधन, कौशल्य आणि जागतिक भान यांचा समन्वय साधल्यास विद्यार्थी अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनू शकतात, असा संदेश त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल मोरे होते. याप्रसंगी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र, पुणेचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे, संस्थेचे सचिव मा. पद्माकरराव हराळकर, सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे, प्राचार्य डॉ संजय अस्वले मा. शैलेंद्र गोस्वामी, डॉ. शैलेश वढेर आणि डॉ. सुयोग अमृतराव यांची प्रमुख उपस्थिती होती.कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच Artificial Intelligence (AI) च्या वापरामुळे मराठवाड्यातील तरुणांसाठी उद्योजकतेचे नवे दरवाजे खुले होत आहेत. स्थानिक समस्यांवर आधारित संशोधन आणि नवकल्पना यांना AI ची जोड मिळाल्यास 'Idea ते Startup' हा मराठवाड्यात उद्योजक घडतील असे प्रतिपादन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष मा यशवंत शितोळे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात केले.कार्यशाळेच्या प्रारंभी मा. शैलेंद्र गोस्वामी यांनी "संशोधन आराखड्यात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका" या विषयावर बीजभाषण करताना आधुनिक संशोधन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता हे अत्यंत प्रभावी साधन ठरत असल्याचे सांगितले. संशोधन विषय निवड, समस्या मांडणी, संदर्भ साहित्याचा अभ्यास, माहिती संकलन, विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणी यांसारख्या विविध टप्प्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी उपयोग होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. सुयोग अमृतराव सत्राच्या अध्यक्षस्थानी होते. दुसऱ्या सत्रात नांदेड येथील डॉ. शैलेश वधेर यांनी "संशोधन पद्धतीशास्त्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता" या विषयावर सविस्तर विवेचन करत संशोधनातील माहिती संकलन, वर्गीकरण, विश्लेषण आणि निष्कर्ष मांडणीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता कशी उपयुक्त ठरते, याची माहिती दिली. युद्धांचा उद्योग, व्यापार चौथ्या सत्रात महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि ENSIN फोरम पुणे चे संचालक मा. संजय जगताप यांनी आयडिया थ◌ॅन ,इनोवेशन आणि स्टार्टअप या विषयावर मार्गदर्शन करत युवकांनी नोकरीच्या संधींबरोबरच उद्योजकतेच्या नव्या वाटाही स्वीकारल्या पाहिजेत, असे प्रतिपादन केले. या राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक आंध्र प्रदेश मधून 367 प्राध्यापक संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलाकार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवकर यांनी केले, तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. आभार कार्यशाळेचे संयोजक डॉ. अजित आष्टे यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य पद्माकर पिठले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी यांची उपस्थिती होती या कार्यशाळेसाठी डॉ विनोद देवरकर, डॉ. ए एस पदमपल्ले, डॉ. व्ही एस सूर्यवंशी, डॉ डी बी ढोबळे, डॉ. डी व्ही बोंदर, डॉ. एस एस रेवते, खंडू मुरळीकर, डॉ. विजय मुळे, ओमप्रकाश पवार, विद्या गायकवाड, अक्षदा बिराजदार संध्याराणी चौगुले आदींनी पुढाकार घेतला.

# आयएएस तुकाराम मुंढेंनी जपला पुरोगामी वारसा : आईच्या अस्थींवर लावले वडाचे रोप



**पुणे :** प्रशासकीय सेवेतील शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आयएएस तुकाराम मुंढे यांच्या मातोश्री आसराबाई यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. आईच्या निधनाची वार्ता समजताच पश्चिम बंगालमध्ये निवडणूक कर्तव्यावर असलेले मुंढे तातडीने पुण्यामार्गे आपल्या बीड जिल्ह्यातील ताडसोना या मूळगावी पोहोचले. संपूर्ण कुटुंबाच्या आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांच्या मातोश्रींवर अंत्यसंस्कार पार पडले. एरवी कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून परिचित असलेल्या तुकाराम मुंढे यांच्यातील संवेदनशील आणि हळवा माणूस या निमित्ताने सर्वांनी पाहिला. आईच्या पार्थिवाकडे पाहून आणि आपल्या भावाच्या गळ्यात पडून अश्रूंना वाट करून देणाऱ्या मुंढेंना पाहून उपस्थित सर्वच जण भावूक झाले होते. आईच्या निधनाने त्यांच्या व्यक्तिगत जीवनात निर्माण झालेली पोकळी आणि त्यांचे मातृप्रेम त्यांच्या या आवेगातून स्पष्टपणे जाणवत होते.

मातोश्रींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी सामाजिक जाणीव जपतानाच पारंपरिक कर्मकांडांना फाटा देऊन एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला. अस्थिविसर्जनासाठी दहा दिवसांची वाट न पाहता किंवा कोणत्याही नदीपात्रात न जाता, त्यांनी दुसऱ्याच दिवशी आपल्या शेतातील घरासमोर एक खड्डा खणला. त्यात मातोश्रींच्या अस्थींचे विसर्जन करून त्यावर वडाचे एक रोपटे लावले. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः राबून हा खड्डा खणला, माती ओतली आणि हे वृक्षारोपण केले.

अनावश्यक रूढी-परंपरांना छेद देत निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची त्यांची ही कृती सध्या समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल होत आहे. वृक्षारोपणाच्या माध्यमातून आपल्या आईच्या आठवणींना चिरंतन जपण्याचा हा स्तुत्य उपक्रम सर्वत्र वाखाणला जात आहे. प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि शिस्त जपणाऱ्या मुंढेंनी आपल्या खासगी आयुष्यातही अशा प्रकारे पुरोगामी विचार कृतीत आणल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ एप्रिल २०२६


## जे. ई. एस. महाविद्यालयात "हिंदी शिक्षण : बदलते परिप्रेक्ष, उभरती संभावनाएँ" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथील हिंदी विभागाच्या वतीने दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी "हिंदी शिक्षण : बदलते परिप्रेक्ष, उभरती संभावनाएँ" या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयातील उच्च शिक्षण विभागाच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या केंद्रीय हिंदी संस्था आग्राच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले असून जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. पुरुषोत्तम जी बगडिया यांच्या अध्यक्षतेखाली या चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष मा. श्री प्रदीप खेडकर हे या चर्चासत्राचे प्रमुख उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार असून केंद्रीय हिंदी संस्थान आग्राचे संचालक डॉ. सुनील कुलकर्णी हे बीज भाषण देणार आहेत. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून एम.एस.पी. महाविद्यालय मानोरा चे प्राध्यापक डॉ. नंदकुमार ठाकरे व डॉ.बा.आं. मराठवाडा विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिल सदस्या डॉ. अपर्णा पाटील या उपस्थित राहणार आहेत तर विशेष अतिथी म्हणून जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. श्री श्रीनिवास जी भक्कड हे उपस्थित राहणार आहेत.या चर्चासत्राच्या प्रथम सत्रामध्ये "अध्ययन-अध्यापन में तकनीकी कौशलों का उपयोग" या विषयावर महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे वरिष्ठ प्रोफेसर डॉ. आनंद पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत तर केंद्रीय हिंदी संस्थान आग्राचे प्रकल्प संचालक आचार्य धनजी प्रसाद हे "अनुसंधान के परिवर्तित क्षेत्र और कृत्रिम मेधा का उपयोग" या विषयावर आपली प्रस्तुती देणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेश मुंढे तर प्रमुख उपस्थितामध्ये डॉ. शिवाजी सांगोळे यांची उपस्थिती राहणार आहे.या चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचे वाचन केले जाणार आहे. या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. विशाला शर्मा तर प्रमुख उपस्थिती डॉ. विजय प्रसाद के अवस्थी यांची लाभणार आहे या सत्राचे समन्वयक म्हणून डॉ. ज्ञानेश्वर महाजन हे काम पाहणार आहेत तर डॉ. रवींद्र भोरे हे या संपूर्ण सत्राचे संयोजन करणार आहेत.या चर्चासत्राचा समारोप समारंभ जालना एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा. फुलचंदजी भक्कड यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून दीनदयाळ शोध संस्थांनचे मा. उपेंद्र भाऊ कुलकर्णी हे उपस्थित राहणार आहेत. याबरोबरच अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ डॉ. बा. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे प्रांत महामंत्री तथा अध्यक्ष डॉ. दिलीप अर्जुने हे उपस्थित राहणार आहेत.

या चर्चासत्राकरिता हिंदी विषयाचे शिक्षक, प्राध्यापक, संशोधक साहित्यप्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री व हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नानासाहेब गोरे यांनी केले आहे.

## अज्ञात वाहनाला स्विफ्ट कारची जोरदार धडक, कार चालकाचा अपघातात मृत्यू तर इतर तीन जण जखमी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** धुळे सोलापूर महामार्गावर जांभळा गावाजवळ अज्ञात वाहनाला स्विफ्ट कारने पाठीमागुन जोरदार धडक दिल्याने कार चालक अतुल बायगा वय २५ रा.सेंदवा जी. वडवाणी, मध्य प्रदेश याचा मृत्यू झाला तर करण चव्हाण वय २६ , राहुल यादव वय २९, लकी रमेश वय २२ रा.सेंदवा, जी.वडवाणी, मध्य प्रदेश हे तीन जण जखमी झाले आहे. सदर अपघात रविवारी पहाटे २.३० वाजे दरम्यान घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसा करण व तिने मित्र मारुती स्विफ्ट कार क्रमांक एम.पी.०९ सी.यफ ७०५६ वडवणी,मध्यप्रदेश येथून बारामती कडे जात असताना धुळे सोलापूर महामार्गावर जांभळा गावाजवळ जात असताना अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिल्याने झालेला अपघातात कार मधील चारही जन जखमी झाले होते, जखमींना जभाळा गाव च्या ग्रामस्थांच्या मदतीने जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थांच्या रुग्णवाहतूक टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यात डॉक्टरांनी तपासून अतुल बायगा याला मृत घोषित केले दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून पोलीस तपास करत आहे


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## भोंदूपणाच्या छायेतलं शिक्षण

शाळा-कॉलेजांत अजूनही अंधार पसरलाय
फळ्यावर विज्ञान पण डोक्यात भोंदू बसलाय
गुरुजींच्या गळ्यात ताईत हातात खडू,
एका हाताने तर्क दुसऱ्या हाताने अंधश्रद्धेचा धूर.

वर्गात न्यूटन, बाहेर चमत्कारांचा बाजार,
हे कसलं शिक्षण? हा कसला व्यवहार?
फळ्यावर तर्क कृतीत उघडा विरोध,
विद्यार्थ्यांच्या मेंदूत पेरताय दुटप्पी रोग.

प्रश्न विचारला की म्हणतात गप्प बैस
मग कसं उभं राहील विचारांचं झाड खास
भीती-धर्म-दबाव मेंदूवर थर साचले
पोरांच्या डोक्यात विचार जन्माआधीच गुदमरले.

गावोगावी उभे बुवा, बाबा, अम्मा, भोंदू
त्यांच्या पायाशी का लोळतात शिकलेले गुरू
गंडे-दोरे, ताईत कर्मकांडांचा जाळ,
तर्क गुदमरतो इथे, वाढतो गुलामीचा काळ.

पुस्तकातले मूल्य पानांतच कैद,
विवेकाचा आवाज जगण्यात कुठंच नाही
धर्म ठेवा घरात शाळा ठेवा मुक्त,
नाहीतर पिढी घडेल अंधश्रद्धायुक्त

उठा आता नाहीतर इतिहास हसेल,
गुरुजी होते पण गप्पच बसले म्हणेल.
घ्या हातात खडू त्यातूनच आग काढा
अंधश्रद्धेच्या मुळावर जाळ काढा

विवेक जागवा तर्काची कास धरा,
सत्यासाठी उभे रहा भीतीला दूर करा.
खडूच्या टोकातून क्रांती पेटवा
विज्ञानाच्या ज्योतीने अंधार जाळा.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## अनिता सुर्यवंशी यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे पालि अ‍ॅण्ड बुद्धिझम विषयात अनिता बापूराव सुर्यवंशी यांना "पालि साहित्यातील स्त्रीदास्यत्वमुक्ती विषयक विचार : एक अभ्यास" या शोध-प्रबंधासाठी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. यांनी प्रा. डॉ. निशिकांत मु. आलटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शोध-प्रबंध सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे आई-वडिल, मार्गदर्शक डॉ. निशिकांत आलटे, सह-मार्गदर्शक डॉ. सुरेश सोनोने, डॉ. शशांक सोनवणे तसेच त्यांचे पती रोहिदास बाबन जगताप, मित्र-मैत्रिणी व नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल** कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103